# अमरावती शहर दैनंदीन गुन्हे अहवाल दि. ०३/०२/२०२३

## खुनाचा प्रयत्न :—

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे नांव पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | सीटी कोतवाली अप क्र ५५/२३ कलम ३०७ भादवी | रघुवीर हॉटेल जवळ शाम चौक अमरावती | दि ०२/०२/२०२३ चे १८.३० घ ता वेळ दि ०२/०२/२०२३ चे २१.५० | मोहम्मद इलीयास मोहम्मद निजामोद्दीन वय २० वर्षे व्यवसाय पॉपकॉन विक्री रा मॉर्डन बेकरी जवळ अन्सार नगर फकीर मोहम्मद यांचे घरी भाडयाने असोरीया पेट्रोलपंप जवळ अमरावती | अनिल देशमुख वय ५० वर्षे रा अमरावती | हकीकत अशाप्रकारे आहे की, घ ता वेळी व ठिकाणी फिर्यादी हा जोशी माकेटच्या समोर येथे हातगाडीवर पॉपकॉन विक्रीचा व्यवसाय करत असुन आरोपी हा दोन तीन दिवसापासुन फिर्यादीच्या हातगाडीवरुन पॉपकॉनचे पॉकीट पैसे न देता स्वता उचलुन घेवुन जात होता आज दि०२/०२/२०२३ चे रोजी १८.०० वा पावेतो जोशी माकेटच्या छोटया गेटसमोर रोडवर हातगाडी लावुन पॉपकॉन विक्री केली परंतु महानगरपालिका अतिक्रमणची गाडी आल्याने फिर्यादीने त्याची पॉपकॉन ची गाडी शाम चौकातील रघुवीर हॉटेल जवळ एका पाणटपरी जवळ उभी केली तेथे अर्धा तास पॉपकॉन विक्री करुन फिर्यादी हा १८.३० वा च्या सुमारास त्याच्या हातगाडीजवळ थांबलेला असतांना आरोपी हा फिर्यादीचे मागुन त्याचे हातात चाकु घेवुन आला आणि फिर्यादीला जिवे ठार मारण्याच्या उददेशाने फिर्यादीच्या डोक्यावर चाकु मारुन फिर्यादीला गंभीर जखमी कले त्यात फिर्यादीच्या डोक्यापासुन गालापर्यत डाव्या बाजुने गंभीर दुखापत होवुन मोठयाप्रमाणात रक्तस्त्राव झाला फिर्यादीला आरोपीने जिवे ठार मारण्याच्या उददेशाने चाकुने गंभीर दुखापत केली असल्याने घटनास्थळावरील आजुबाजुचे लोक आरोपीच्या दहशतीमुळे तेथुन घाबरुन पळुन गेले त्यानंतर फिर्यादी हा जखमी अवस्थेत पोस्टे येथे आल्यावरुन त्याला उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालय येथे दाखल केले फिर्यादीवर उपचार चालु असतांना तो बोलण्याच्या स्थितीत असल्याबाबत वैद्यकीय अधिकारी डॉ मोहन कंटाळे यांनी लेखी अभिप्राय दिल्यावरुन तसेच इन्जुरी सर्टीफिकेट दिल्यावरुन फिर्यादीच्या जिल्हा सामान्य रुग्णालय अमरावती येथील अपघात कक्षात रिपोर्ट नोंदविला त्यावरुन डि ओ आदेशाने सदर गुन्हा दाखल |

**दुखापत :–**

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | बडनेरा अप.क्र. १०५/२०२३ कलम ३२३, ३२४, ५०४, ५०६,३४ भा.दं.वि. | निंभोरा नगर बडनेरा | दि. ०२/०२/२०२३ रो. २०/०० वा. दाखल वेऴ दि. ०२/०२/२०२३ चे २३/१४ वा. | एक महिला | सचिन पुंडलीकराव अढाउ वय ४२ वर्ष २) एक महिला ३) एक महिला ४) एक महिला सर्व रा. निंभोरा नगर बडनेरा | हकीकत अशाप्रकारे आहे की, दि. ०२/०२/२०२३ रो. दुपारी ०२/०० वा मी व सोबत एक महिला असे आम्ही माया नगर अम. येथील पाठक यांचे घरी लग्न कार्य झाल्याने बक्षीस मागणयास गेले होते. तर तेथे तृतीय पंथीच्या सचिन पुंडलीकराव अढाउ वय ४२ वर्ष रा.निंभोरा नगर बडनेरा त्याचे सोबत तृतीय पंथीचे तीन साथीदार आले व त्याना आम्ही घेतलेले बक्षीस चे पैसे चे बाबत हा ऐरिया आम्हचा आहे. यावरुन भांडण केले त्याबाबत मी राजापेठ पो. स्टे.येथे रिपोर्ट दीला. नंतर मी आम्हचे गुरु यांचे कडे निंभोरा नगर बडनेरा येथे आली असता दि. ०२/०२/२०२३ चे रात्री ०८/०० वा. दरम्यान नमुद आरोपी हे आमचे कडे आले त्याच्या सोबत तृतीय पंथीतील ईतर साथीदार होते वरिल चौधीना माझ्यासोबत भांडण करुन शिवीगाळ केली व लाथा बुक्यानी मारहाण केली तेव्हा मला वाचविण्यास काही व्यक्ती मधात आल्या असता त्याना त्या चौधीनी काठ्यानी दगडानी मारहाण करुन जखमी केले तेव्हा मी कशीतरी वाचुन मागुन बडनेरा पो. स्टे. येथे रिपोर्ट देण्यास आली मला वाचवीना-या याना वरिल चौघीनी शिवीगाऴ करुन लाथा बुक्यानी विटांनी मारहाण करुन धमकी दिल्याने त्याच्यानवर कारवाई होणेस रिपोर्ट देत आहे. अशा जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| २. | पो. स्टे. राजापेठ अप क्र. १२०/२३ कलम २८७,३३७ भादवी | दरोगा प्लॉट हनुमान गल्ली नं. १ अमरावती शहर | घ.ता. वेळ दि. ३१/०१/२०२३ चे १७.०० वा दरम्यान दा.ता. वेळ दि. ०२/०२/२३ चे ०१/३५ वा | बंटि स्वामीदीन मेहरुलीया वय ३५ वर्ष रा दरोगा प्लॉट हनुमान गल्ली नं. १ अमरावती शहर | राजेश जावे रा दरोगा प्लॉट अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी हा आरोपीच्या घरी भाड्याने राहत असुन यातील आरोपीने फि.यास बल्ली कापण्याकरीता बोलावले असता फि. ने बल्ली पकडली व यातील आरोपीने ती बल्ली ग्रँन्डर मशीनने कापत असतांना सदर ग्रँन्डर मशीन व्यवस्थीत न पकडता त्या मध्ये हयगई करुन ग्रँन्डर मशीन हातातुन सुटुन फि.चे उजव्या पायाचे हड्डीवर लागली त्यामुऴे पायाला जखम होवुन रक्त निघाले आहे. अशा फिर्यादीच्या जबाणी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |

## वाहन चोरी :–

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | पो.स्टे. फ्रेजरपुरा अम.शहर अप क्र.१०२/२०२३ कलम ३७९ भादवि | श्री क्रिष्णा ट्रेडर्स चे दुकामासमोर जीवन ज्योती कॉलनी अमरावती | घ.ता.वेळ दि.३१.०१.२०२३ चे रात्री ०९.१० वा दा.ता.वेळ दि.०२.०२.२०२३ चे १३.५१ वा माहीती दि.०२.०२.२०२३ चे १३.२० वा | अमीन युसुफ गोचेवाले वय २२ वर्ष,धंदा-चालक, रा. फ्रेजपुरा अकर पान सेंटर जवळ अमरावती | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी यांनी पो.स्टे. ला येवुन जबाणि रिपोर्ट दिला की, फिर्यादी हे दि.३१.०१.२०२३ रेजी रात्री ०९.१० वा दरम्यान त्याचे जावायाचे नावाने असलेली ऑक्टीव्हा ६जी BX DLX जिचा चेचिस नं,ME४JF९!४GMG५४६५९०, इंजिन नं,JF९!EG१५४५६९७ कि.अं.५४,०००/-रु. ग्रे रंगाची गाडीने चुलत भाउ अलताफ सलिम यांचे सोबत लग्नाचे गिफ्ट खरेदी करिता श्री क्रिष्णा ट्रेडर्स चे दुकामासमोर जीवन ज्योती कॉलनी अमरावती येथे थोड्या अंतरावर असलेले दुकानात गाडी बाजुला लॉक न करता गिफ्ट खरेदी करिता गेलो व गिफ्ट खरेदी केल्यानंतर गाडी लावलेल्या ठिकाणी परत आलो असता गाडी दिसुन आली नाही. आजुबाजुला विचारपुस केली व शोध घतला मिळुन आली नाही ती कोणीतरि अज्ञात चोराने चोरुन नेली.आज पोवेतो गाडीचा शोध घेतला मिळुन आली नाही.अशा फिर्यादीचे जबाणि रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल . |
| २ | पोस्टे गाडगेनगर अमरावती अप क्र १५८/२०२२ कलम ३७९ भादवी | व्ही एम व्ही कॉलेज चे पार्कीग मध्ये अमरावती | दि ०२.०२.२०२३ चे १०.३० वा<br><br>दि ०२.०२.२०२३ चे १८.५४ वा | चंद्रशेखर अजय उमप वय १७ रा इद्रप्रस्था कॉलनी शेगाव नाका अमरावती | अज्ञात | नक्कल जबानी रीपोर्ट मी समक्ष पोस्टेला येवुन जबानी रीपोर्ट देतो की वरील पत्तावर राहतो व व्ही एम व्ही कॉलेज शीक्षण घेत आहो आज दि ०२.०२.२०२३ रोजी १०.३० वा परीक्षेचे हॉल टीकीट घेणे करीता गेलो होतो व माझ्ी सायकल ही पार्कीग ला लावली होती तर मी माझ्े परीक्षेचे हॉल टीकीट घेवुन सायकल पार्कीग मध्ये सायकल घेणे करीता आलो तर माझ्ी सायकल मला मीळुन आली नाही तसेच मी पोलीस स्टे ला येवुन रीपोर्ट देत आहे माझ्े सायकलचे वर्णन कलर ऑरेन्ज काळा असुन फेम नं ८७१२००१० हा आहे व की अं ८००० रू आहे तसेच कंपनी raligh cycle fr no n21142613 असा फेम नं आहे अशा वर्ण्नाची असुन ती चोरीला गेली आहे माझ्ी सायकल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेली आहे हाच माझा जबानी रीपोर्ट माझ्या सांगणेप्रमाणे लीहीला बरोबर आहे अशा फीर्यादीचे जबानी रीपोर्ट वरून सदर चा गुन्हा दाखल |
| ३ | पोस्टे वलगाव अप.क्र ५०/२०२३ कलम | ग्राम थुगाव शेतशिवार | दि.३१/०१/२०२३ चे १७/०० वा १७/३० वा.दरम्यान | आकाश चंदु अवसरमोल वय २७ वर्ष रा. थुगाव खानापुर ता.जि. | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील नमुद फिर्यादी यांचे शेत थुगाव खानापुर शेतशिवार षेत शिवार सर्वे क्र.१०५ मधे असुन फिर्यादी हे शेतात फेरफटका मारण्याकरीता गेले आणि आपले शेताचे धु-यावर त्याटी मो. सायकल उभी करुन गेले व अर्धा तासानंतर परत गाडीजवळ आले असता त्याची मो.क्र ही उभी केलेल्या ठीकाणी दिसुन आली नाही सदर गाडी चा आजु बाजुच्या परीसरात व आजु बाजुचा गावात शोध घेतला मिळुन आली नाही तरी माझी मो.सायकल कोण्यातरी अज्ञात चोराने चोरुन नेले आहे म्हणुन आज दिनांक ०२/०२/२०२३ रोजी पोस्टेला चोराविरुध्द |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ३७९ भादवि | | माहीती .दि.०२/०२/ २०२३ चे १६/१५ वा दाखल दि.०२/०२/२ ०२३ चे १७/४१ वा | अमरावती | | कारवाई करीता रोपोर्ट देत आहे . असा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल . |

## चोरी :—

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोस्टे गाडगेनगर अमरावती अपक्र १५६/२०२३ कलम ४६१,३८० भादवी | चीत्रकांत जयस्वाल यांचे गोडावुन वलगाव रोड अमरावती | दि २१.१.२०२३ चे १२.०० वा ते ०१.०२.२०२३ चे १८.०० वा दरम्यान<br><br>दि ०२.०२.२०२३ चे १६.५७ वा | सचीन लक्ष्मनराव वाडेकर वय ३७ व्यवसाय फलॅक्स प्रींटींग रा उर्वशी नगर कठोरा रोड अमरावती | अज्ञात | नक्कल जबानी रीपोर्ट पोस्टे गाडगेनगर दि ०२.०२.२०२३ मी समक्ष पोस्टेला येवुन जबानी रीपोर्ट देतो की वर नमुद पत्त्यावर राहतो व फॅलाक्स प्रींटींग काम करतो मी वलगाव रोड वरील चीत्रकांत जयस्वाल यांचे गोडावुन गेल्या एका वर्षापासुन भाडयाने घेतले माझ्या फलॅक्स प्रींटीगचा व्यवसाय असल्याने बॅनरला लावण्याचे पाइप बनवण्याचा व्यवसाय मी त्या गोडावुन मध्ये करतो सध्या व्यवसाय बंद आहे दि २१.०१.२०२३ रोजी दुपारी १२.०० वा मी वलगाव रोडवरील गोडावुन गेलो त्यावेळी मशीनरी व इतर सामान व्यवस्थीत होते व नंतर मी गोडावुनचे शटर बंद करून मी माझ्े घरी निघुन गेलो दि ०१.०२.२०२३ रोजी मला गोडावुन मालक नामे चीत्रकांत यांचा फोन आला मला गोडावुन ची चाबी पाहीजे तर मी सायंकाळी ०६.०० वा सुमारास गोडावुनकर गेलो गोडावुन मालक सोबत होते तर गोडावुन चे शेटर मी उघडले तेव्हा पाइप बनवन्याची मेन मशीन वरील १ एच पी कटर मशीन की अं ४५०० रू २ २एचपी वेल्डींग ग्राइछर की अं ४५०० रू ३ टील्युपंप पाणी मशीन की अं १००० रू ४ रोलडायसेट ४२ नगर की अं ५००००रू एकुन ६०००० रू कीमतीचा माल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला अशा फीर्यादीचे रीर्पोट वरून सदर चा गुनहा दाखल . |
| २ | पोस्टे गाडगेनगर अमरावती अपक्र १५७/२०२२ कलम | तपोवन गेट अमरावती | दि ०२.०२.२०२३ चे १०.०० वा दरम्यान<br><br>दि | प्रफुल वामनराव काकडकर वय ३५ व्यवसाय ठेकेदार रा .सुयोग कॉलनी शीरीष | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घतावेळी व ठीकानी मी समक्ष वीचारल्यावरून सांगतो की मी वरील पत्यावर माझ्या परीवारासह राहते व मी ठेकेदारीचे काम करतो मी गेल्या ४ वर्षापासुन ठेकेदारीचे काम करतो मी एक वर्षापासुन तपोवन गेट ला अंशुमन बील्र्डस ՛ मालक मंगेश सुधाकर हजारे व नीलय पाटील यांच्या भागीदारी असलेल्या मालकीचे सहयाद्री हाइट्रस या अपार्टमेंन्ट चे बांधकामाचे ठेकेदारीचे काम घेतले होते मी बांधकामासाठी लागणारे्एकुन २९४ कीलो लोखंड दि २३.०१.२०२३ रोजी एस टी /एस..एस या दुकानातुन पत्ता जुने कॉटन र्माकेट अमरावती येथुन विकत घेतले होते व दि २४.०१.२०२३ पासुन माझ्या बांधकामाच्या ठीकानी अर्पाटमेन्टसाठी लागणा-या लोखंडी पाय-या बनवीण्याचे काम सुरू केले होते काल दि ०१.०२.२०२३ पर्यंत जिण्यासाठी लागणा-या पाय-याचे सुटे भाग बनवीणे चालु होते व एकुन १६ लोखंडी पाय-या मजुर |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ३७९ भादवी | | २.२.२०२३ चे १७.२१वा | अपार्टमेंन्ट कोंटाचे मागे अमरावती | | लोकांनी बनविल्या होत्या मजुर लोकांनी लोखंडी पाय-या बनवुन सायंकाळी ६.०० वा त्या मोकळया जागेत ठेवुन नीघुन गेले रात्री ०७.३० वा घरून नीघुन गेले होते आज दि ०२.०२.२०२३ रोजी मी सकाळी १०.०० कामावर गेलो तेव्हा मला जिन्यासाठी बनवीलेल्या एकुन १६ लोखंडी पाय-यापैकी ७ लोखंडी पाय-या कमी दीसल्या त्या मुळे आजुबाजुला शोध घेतला मीळुन आल्या नाही माझ्या बांधकामावरील एक लोखंडी पायरी वजन १८ कीलो अशा एकुन ७ पाय-या वजन १२६ की की अं ८००० रू चे काणीतरी अज्ञात चाोराने चोरून नेल्या वरून सदर चा गुन्हा दाखल . |
| ३ | पोस्टे राजापेठ अप क्र. १२१/कलम ३७९ भादवी | हिरा कॉलनी गोपाल नगर जवळ अमरावती शहर | ७/१२/२२ चे १०/०० वा ते दि ०१/०२/२३ चे ११८/०० दरम्यान ०२/०२/२३ चे २१/४३ वा | भालचंद्र महादेवराव बिजवे वय ७३ रा हिरा कॉलनी गोपाल नगर जवळ अमरावती | अज्ञात<br>सदर आरोपीचे नाव अपुर्ण असल्यामुळे गुन्हे निष्पन्न होवु शकत नाही | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी यांचा अपघात झाल्याने हॉस्पीटल मध्ये व त्यानंतर बाहेरच असलयाने दि ०१/०२/२३ रोजी ११/०० वा नमुद ठिकाणी घरी गेला असता वरील वर्णनाचा बोअरवेल चे सामान कि अं १६८४० रु चे कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेले अशा फिर्यादीच्या जबाणी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल. |

## घरफोडी :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | पो.स्टे. फ्रेजरपुरा अम. शहर अप क्र.१०१/ २०२३ कलम ३८०, ४५४ | फ्लॅट क्र.१०१ जवादे रेसीन्डेंन्सी बियाणी चौक अमरावती | घ.ता.वेळ दि.०१.०२.२०२३ चे सकाळी १०.१५ वा ते रात्री २१.१५ वा दरम्यान दि.०१.०२.२०२३ चे २३.४५वा दा.ता.वेळ दि.०२.०२.२०२ | दिनेश प्रभाकर नंदनवार वय ४९ वर्ष,व्यवसाय-नौकरी,रा. स्नेहा नगर,नागपुर, ह.मु.जवादे रेसिडेंन्सी,बियाणी चौक अमरावती | अज्ञात | हकीकत अशा प्रकरे आहे की, यातील फिर्यादी यांनी पो.स्टे. ला येवुन जबाणि रिपोर्ट दिला की, फिर्यादी हे दि.०१.०२.२०२३ चे १०.१५ वा भारतीय बॅक होमलेन प्रोसेसिंग सेंटर सिंधी चौक अमरावती येथे ड्युटी वर गेले व रात्री २१.१५ वा त्यांचे फ्लॅट क्र.१०१ जवादे रेसीन्डेंन्सी बियाणी चौक अमरावती येथे परत आले तर त्यांना दाराचे कुलुप तोलेले दिसले.फिर्यादी यांनी आत मध्ये पाहणी केली असता त्यांनी त्यांचा एच पी कंपनीचा लॅापटॉप किं.अं.१२,०००/-रु. व सॅमसंग कंपनीचा आयपॅड किं.अं.१०,०००/-रु. असा एकउण २२,०००/-रु.चा घरात मिळुन आला नाही सदर मुद्देमाल कोणीतरि अज्ञात चोराने चोरुन नेला आहे.अशा फिर्यादीचे जबाणि रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | भादवि | | ३ चे ०१.२९ वा | | | |
| २. | पो स्टे गाडगे नगर अमरावती अपक्र १५५/२०२३ कलम ४५४,३८० भादवी | राठी नगर येर्थील डा मोरे हास्पीटल जवलील जुने बंद घर अमरावती | घता वेळ दि ०१.०२.२०२३ चे १७.३० वा<br><br>दाखल ता वेळ -०२.०२.२०२३ चे १४.१४ वा | सुजीत धनवंतराव काळमेघ वय ४३ वर्ष रा राठी नगर अमरावती अमरावती | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घतावेळी व ठीकानी नमुद फिर्यादी व फिर्यादी सोबत सफाई करणारा दिपक संगेल असे बंद घरी घ ता वेळी गेल्यानंतर घराचे दरवाजे लाक बंद होते लात उघडले तेव्हा खालच्या बाथरुमचे पाण्याचे मिक्सर किंमत अंदाजे १००० रु जुने वापरते ,पाण्याचे सेफ्टीहॅंड कि अं ५०० रु जुने तसेच वरच्या माळ्यावरील दोन्ही बाथरुम मधईल पाण्याचे मिक्सर,दोन्ही मिक्सर कि अं २००० रु दोन्ही बाथतरुम मर्धील पाण्याचे २ सेफ्टी हॅंड कि अं १००० रु असा एकुण ४५०० रु चा माल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला वरून अज्ञात चोरावीरूध्द पोस्टेला रीर्पोट देत आहो वरून सदर चा गुन्हा दाखल |

## विनयभंग :-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | पो.स्टे. सायबर, अमरावती शहर<br><br>अप. क्रं. ०६/२०२३ कलम ३५४ (A) भादंवि सहकलम<br><br>६६(C) माहिती व तंत्रज्ञान | क्वार्टर क्रं.१९, मिल्ट्री कॅम्प, पोलीस लाईन, विदयुत भवन जवळ, अमरावती | घटना ता. वेळ :<br><br>दि १४/१२/२०२२ चे २३.००वा. ते दि.३०/१२/२०२२ चे ००.००वा.<br><br>माहिती ता. वेळ:<br><br>३१/१२/२०२२ | एक अल्पवयीन तरुनी | Instagram Profile Name shilpa९७६२ user पत्ताः अमरावती, अमरावती, गाडगेनगर, अमरावती शहर, महाराष्ट्र, भारत | हकीकत अशाप्रकारे आहे की, आज रोजी यातील फि. यांनी पो.स्टे. ला येवून तक्रार दिली की, दि.३०/१२/२०२२ रोजी फिर्यादी यांचे बहीणीस माहिती मिळाली की, मावस भाऊ देवेश पथे रा. नागपूर याचे इन्स्टाग्राम अकाऊंटवर त्यांची बहीन ही अश्लिल मॅसेज पाठवून चॅटींग करीत आहे. वरुन फि. यांनी सांगीतले की कुणीतरी तिच्या बनावट अकाऊंटवरून अश्लील चॅटींग करीत आहे. विवादित इंस्टाग्राम आय.डी. तपासले असता त्यामध्ये फि. यांचा प्रोफाईल फोटो असलेल्या इन्स्टाग्राम असुन अकाऊंट वर Shilpa१२७२२५ हा दिसला फि. यांचे नावाचा व फोटोचा वापर करुन व अकाऊंट तयार करुन नमुद इन्स्टाग्राम धारक हा सोशल मिडीयाव्दारे अर्जदार यांची बदनामी करीत आहे, अशा फिर्यादिचे जबानी रि.वरुन तसेच अर्जचौकशी वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला.<br><br>तपासी अधिकारी: श्रीमती सिमा दाताळकर, पो.नि. पो.स्टे. सायबर, अमरावती शहर |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | कायदा | | चे १७.५० वा.<br><br><br>दाखल ता. वेळ: ०२/०२/२०२३ चे ११.३२ वा. | | | |

**अपघातः-**

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| 1 | पो स्टे गाडगे नगर अमरावती अपक्र. १५४/२३ कलम-२७९,३३७ भादवि १३४ मोवाका | घटनास्थळ-पालिटेक्निक कालेज समोर नामदेव महाराज मंदीर चे बाजुला ्मरावती | घटना तावेळ दि. ०१/०२/२३ चे २३.०० वा दाखल तावेळ दि.०२/२/२३ चे ०४.०२ वा | मोहम्मद इलीयाज मोहम्मद अयाज वय २९ वर्ष रा चिलमछावणी ्अमरावती | चारचाकी क्र एम एच १२ जे एल ४८४९ चा चालक | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घतावेळी व ठिकानी यातील फिर्यादीचा भाऊ व त्याचा मित्र डिस्कव्हर गाडी क्र एम एच २७ ए एक्स ७०६९ ने अपर वर्धआ कार्यालय वरुन राठई नगर येत असतांना त्या दरम्यान पालीटेक्नीक कालेज समोर नामदेव महाराज मंदीरचे बाजुने एक फोर व्हीलर क्र. एम एच १२ जे एल ४८४९ ने विरुदध दिशेने येवुन सदर वाहनाचे चालकाने त्याचे वाहन भरधआव वेगाने व निष्काळजीरणे जोरात चालवन फि चे भाऊ व त्याच्या मित्र ह्यांना जखमी करण्यास कारणीभुत झाला. अशा फिर्यादीच्या जबानी रि. वरुन सदर चा गुन्हा दाखल |
| 2 | पोस्टे गाडगेनगर अमरावती अपक्र १५९/२०२३ कलम २७९,३३७ भादवी सह १३४ मोवाका | बालाजी हार्डवेअर समोर अंबा अपार्टमेन्ट कठोरा रोड अमरावती | घतावेळ दि०२.०२.२०२३ चे १०.३० वा दरम्यान<br><br>दि ०२.०२.२०२३ चे २०.५९ वा | प्रज्वल रामदास तोटे वय २५ व्यवसाय शीक्षण रा आनंदवाडी देशमुख सीमेंट डेपो मागे कठोरा रोड अमरावती | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की मी समक्ष विचारले वरून सांगते की मी वरील पत्यावर राहते इंजीनिअरींग चे शीक्षण घेत आहे दि ०२.०२.२०२३ रोजी दुपारी ०२.४५ वा सुमारास मी कठोरा रोडने पायी जात असतांना बालाजी हार्डवेअर समोर अंबा अपार्टमेन्ट येथुन पायी रोड क्रास करीत अससतांना कठोरा नाक्या कडुन एक टु व्हीलर मोटर सायकल स्वाराने मला धडक दीली त्या मुळे मी खाली पडलो तर मला माझे उजव्या पायाला उजव्या हाताला व डोक्याला मार लागला मला माझ्या मीत्रांनी ऑटो मध्ये नवजीवन हॉस्पीटल मध्ये उपचारा करीता आनले मला डॉ सा यंनी तपासुन उजव्या पायाचे एक्सरे काढुन फॅक्चर असल्याचे सांगीतले उजव्या हाताला कच्चे बॉडेज लावले जेव्हा मला टु व्हीलर सायकल स्वाराने धड मारली तेव्हा काही अतरावर माझी बहीन ती सुध्दा घाबरली होती माझेवर उपचार सुरू आहे दि २.२.२०२३ रोजी दुपारी २.४५ वा चे सुमारास मी कठोरा रोडने पाइ जात असतांना बालाजी हांड वेअर समोरून अंबा अपार्टमेन्ट येथुन पाइ क्रास करीत असतांना कठोरा नाका वरून अज्ञात टु व्हीलर स्वराने भरधाववेगाणे व नीष्काळजी पणे मीसा चालवुन मला धडक देवुन उजव्या पायाला फॅक्चर केले तसेच उजव्या हाताता व डोक्याला मार लागुन जख्मी करून पळुन गेले मीटर सायकल मागे अजुन एक व्यक्ती बसला होता मला मोसा चा नंबर माहीती नाही अरी अज्ञात टुव्हीलर मो सा चे चालका विरूध्द रीपोर्ट देत आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 3 | पोस्टे वलगाव ५१ / २०२३ कलम २७९, ४२७ भादवि. | वायगाव फाट्या जवळ | दि.०२/०२/२०२३ चे २०/०० वा.<br><br>माहीती ०२/०२/२०२३ २०/४५ वा.<br><br>दाखल ०२/०२/२०२३ चे २३/४४ वा. | प्रेमलाल भुरेलाल वरठी वय ४९ वर्ष व्यवसाय चाकल रा.सावळी सापन पोस्टे ऑफिस धोतरखेडा<br><br>ता.अचलपुर जि.अम. | MH २७ BL १०५२ चा चालक | हकिकत आशा प्रकारे आहे कि,दि.०२/०२/२०२३ रोजी २०/०० वा.दरम्यान फिर्यादी वन संशोधन केन्द्र परतवाडा येथील सरकारी चार चाकी वाहन टाटा सुमो क्र.MH१२AH ६१९२ ने अमरावती वरुन वलगाव मार्गे परतवाडा जात असताना.सोबत सौ.अर्चना जगदिश अलोकार वय ३३ वर्ष (वन परीक्षेत्रे अधिकारी ) श्री पि.बि.कडु वन रक्षक ,कु.जोती वानखडे वन रक्षक ,एस .डी.भोरे वन रक्षक असे सर्व गाडी मध्ये बसलेले असतांना वायगाव फाट्या जवळ स्पिड ब्रेकरवर समोरुन परवाडा कडुन येणारी दुचारी क्र.MH २७ BL १०५२ चे चालकाने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काजी प्रमाने चालवुन गाडी क्र. MH१२AH ६१९२ ला समोरुन जोर दार धडक दिल्याने फि.चे गाडीचे समोरी गार्ड न.प्लेट ,समोरील काच तुटल्याने नुकसान केले.व आरोपि हा स्वता जखमी झाला .अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन सदरच गुन्हा दाखल |

## इतर :—

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | बडनेरा अप.क्र .१०४/२०२३ कलम १८८ भा.दं.वि. | मतमोजणी विभाग नेमाणी गोडावुन बडनेरा | दि.०२/०/२०२३ चे १२.४५ वा ,दाखल दि ०२/०२/२०२३ ते १३.५९ | पोहेका शैलेश मोरे ब.नं.१०२९ पोस्टे बडनेरा अमरावती शहर | विशाल सुभाषराव तायडे वय ३७ वर्ष रा .डॉ बाबासाहेब आबंडकर पुतळ्याजवळ वनारसी पो.स्टे नागपुरी गेट अमरावती | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील फिर्यादी ोहेका शैलेश मोरे ब.नं.१०२९ पोस्टे बडनेरा अमरावती शहर यांनी पोस्टे ला लेखी फिर्याद दिली की उपरोक्त विषयान्वये लेखी फिर्याद देतो की पो.ठाणे बडनेरा अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन आज दि ०२/०२/२०२३ रोजी सकाळी ६.०० वा पासुन पो.स्टे बडनेरा हद्दीतील नेमाणी गोडाउन या ठीकाणी पदवीधर मतदार संघ निवडणुकीची मतमोजणी चा कार्यक्रम असल्याने त्या ठीकाणी मी ड्युटीवर हजर होतो .आज दि ०२/०२/२०२३ चे १२.४५ वा सुमारास नेमाणी गोडाउनया ठीकाणी एका ईसमाने कर्मचारीकरीता जेवणाची व्यवस्था करण्यात आलेल्या मेसकडे असलेल्या भागातुन मजमोजणी चालु असलेल्या भागाकडे आत प्रवेश केला सदर ठीकाणी सर्व सामान्यांना मत मोजणी सुरक्षेच्या कारणाने मा जिल्हाधिकारी यांचे आदेश क्र कक्ष-२७म.स.-१/गृह विभाग /पदविधर निवडणुक /कावि -६९/२०२३ दि २३/०१/२०२३ नुसार दि ०२/०/२०२३ चे सकाळी ६.०० वा पासुन तर मतमोजणी पुर्ण होईपर्यंत मतमोजणी केद्रात प्रवेशाकरीता मनाई करण्यात आली आहे याआदेशाला योग्य प्रसिध्दी देण्यात आली तरी सुध्दा कायदेशीर आदेशाचे उल्लघन करुन नमुद ईसमाने आतप्रवेश केला त्यांना नाव गाव पत्ता विचारला असता त्याने त्याचे नाव विशाल सुभाषराव तायडे वय ३७ वर्ष रा .डॉ बाबासाहेबआबंडकर पुतळ्याजवळ वनारसी पो.स्टे नागपुरी गेट अमरावतीअसे सागितले व्यवसाय वार्ताहारएन. टी .व्ही . मराठी साठी ,काम करतो असे सांगितले नमुद इसमाने मा जिल्हाधिकारी यांचे |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | आदेश क्र कक्ष-२७म.स.-१/गृह विभाग /पदविधर निवडणुक /कावि -६९/२०२३ दि २३/०१/२०२३ नुसार चे उलघ्घन केल्याने सदर इसमाचे कृत्य कलम १८८ भा.द.वि प्रमाणे अपराध होत असल्याने त्याचे विरुध्द कायदेशिर कारवाई करणेकरीता हिच माझी कायदेशिर फिर्यात आहे .अशा जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल . |

## अकस्मात मृत्यु:-

| अ. क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना स्थळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | मरणाचे कारण | अकस्मात मृत्यूचे विवरण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | पो.स्टे. फ्रेजरपुरा अम.शहर मर्ग क्र.०६/२०२३ कलम १७४ जा फौ | चपराशीपुरा वॉर्ड क्र १३ अमरावती<br><br>घटना ता वेळी दि.१८/०१/२०२३ चे २३.०० वा<br><br>दाखल ता वेळी दि.०२/०२/२०२३ चे २२.२६ वा. | एक महिला | मसपोउपनि लता ठाकरे बनं ८६४, पो स्टे फ्रेजरपुरा अम शहर | उपचारादरम्याण मरण पावली | नक्कल खबरी रिपोर्ट पो स्टे अजनी जि नागपुर हकीकत अशा प्रकारे आहे की, मृतक दि.११/०१/२०२३ चे सकाळी ०७.०० वा ते ०७.३० वा दरम्याण आपल्या राहत्या घरी अंघोळ करण्या करीता बाथरुम मध्ये गेली असता पाय घसरुन पडल्याने पो स्टे हद्दीत डोक्याला मार लागुन जखमी झाल्याने प्रथम उपचाराकरीता सरकारी दवाखाना ईर्विन अमरावती नंतर रेफर मेडीकल हॉस्पिटल ट्रामा आयसीयु (२) ट्रामा सेंटर टिकीट क्र ३६८२८६९७ एमएलसी क्र ३२२१८ दि.१३/०१/२०२३ चे ०९.०४ वा भरती केले असता उपचारादरम्याण तेथील वॉर्डचे एमओ यांनी तपासुन दि.१८/०१/२०२३ चे २३.०० वा मृत घोषित केले प्रेतचे पीएम करुन प्रेत नातेवाईक यांचे ताब्यात देण्यात आले वरील खबरी रिपोर्ट व अजनी पोलीस स्टेशन नागपुर येथुन ००/२३ चे डायरी ईडेक्स प्रमाणे प्राप्त झाल्याने व मेमो वरुन सदरचा मर्ग दाखल करुन तपासात घेतला तसेच पो.उपायुक्त परि-१अमरावती यांचे आर/सीबी/अक.मृ.-वर्ग/२१७/२३ दि.०१/०२/२०२३ अन्वये प्राप्त पत्रावरुन सदरचा मर्ग दाखल . |
| २ | पोस्टे वलगाव ०५/२०२३ कलम १७४ | ग्राम विर्शि फि.चे राहते घरी. | सोपान हरीभाऊ गाळे वय ३२ वर्ष रा.ग्राम विर्शी | सतिश हरिभाऊ गाळे वय २५ वर्ष रा.ग्राम विर्शी ता.भातकुली.जि.अमरावती. | गळफास घेवुन आत्माहत्या | हकिकत आशा प्रकारे आहे कि,नमुद घटना ता.वेळी व ठीकानी यातील फिर्यादी यांचा भाऊ मृतक नामे सोपान हरिभाऊ गाळे वय ३२ वर्ष हा दारु पिण्याच्या सवई चा होता.काल दि.०१/०२/२०२३ रोजी संयकाळी २०/०० वा.फिर्यादीचा भाऊ व फिर्यादी हे कामावरुन घरी आले असता.फिर्यादीच्या भावाने त्याचे आई ला दारु पिण्या करीता पैसे मागीतले असता.आई नी पैसे दिले नाही.त्यामुळे त्याने घरातील सर्व शिवीगाळ व मारण्या करीता अंगावर धावु लागला .त्यानंतर त्याने सर्वाना घराचे बाहेर हकलुन दिले.फिर्यादी हे घाबरुन गावातील शाळेजळ येथुन थाबले .थोडावेळात माहीत पडले कि,फिर्यादीच्या भाऊ नामे सोपान हरीभाऊ गाळे यांने घरातील लाकडी बल्ल्ी ला (नाट) पांढ-या सुती दोरीने गळफास घेतला.असे माहीती पडले .फि.ने.स्वता जावुन पाहीले असता.फि.्चा भाऊ गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसला.फि.ने.पोलीसाना माहीती.दिली.व पोलीसानी घटनासथळी येवुन गळफास घेतलेल्या व्यतीस खाली काढले.व ईर्विन दवाखाना अमरावती येथे नेले .असता.डॉ.सा.यांनी त्याला चेक करुन मृत घोषीत केले.सदर मृतकाचे पि.एम.करुन व फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन सदर व डि.ओ.सा.आदेशाने सदर चा मर्ग दाखल . |

## जुगार :-

| अ.क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | नागपुरी गेट अमरावती शहर | अप क् ५४/२०२३ कलम १२ (अ ) महा जुगार कायदा | अकबर नगर नाल्ययाज वळ अमरावती | ०२/०२/२०२३ चे १२/२० वा त १३/१० वा | ०२/०२/२०२३ चे १४/२१ वा | पोउपनि गजानन विधात पो.स्टे नागपुरीगेट अमरावती | नाजीम शाहा कासीम शाहा वय ४० वर्ष रा. रोशन नगर अमरावती सदर आरोपीवर गुन्हे दाखल नाही | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता वेळी व ठिकाणी मिळालेल्या गुप्त माहीती वरुन नमुद आरोपीवर जुगार रेड केली असता त्याचे ताब्यातुन जप्तीपंचनाम्या प्रमाने नगदी १,२२० रु. २) १ ते १० आकडे लीहलेले मटका जुगाराच्या चिठ्या ३) एक बॉल पेन कि. ५ रु असा एकुन १,२२५ रु चा माल मिळुन आला वरुन नमुद आरोपी विरुद्ध सदरचा गुन्हा दाखल |

## प्रोव्हीशन

| अ.क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | पो.स्टे. फ्रेजरपुरा अम.शहर | झोन क्र. १ अप क्र. १०३/२०२३ कलम ६५ (ई) महा.दारुबंदी कायदा | कुंभारवाडा बायपास रोड अमरावती | दि.०२/०२/२०२३ चे १८.०० वा ते १८.३० वा दरम्याण माहीती वेळ दि.०२/०२/२०२३ चे १९.०० वा. | दि.०२/०२/२०२३ चे १९.३१ वा. | सरतर्फे पोहेकॉ सतिष भाऊराव देशमुख वय ५१ वर्ष, ब नं १२२२, गुन्हेशाखा अमरावती शहर | एक महिला | हकीकत अशा प्रकारे आहे की, आज दि.०२/०२/२०२३ चे १६.०० वा पासुन आम्ही सोबत पोउपनि नरेशकुमार मुंढे सा, पोहेकॉ राजुआप्पा ब नं ३४२, फिरोज ब नं १०९६, पोकॉ सुरज ब नं ४०६, काकड ब नं ४१६, मपोकॉ अस्मिता १६३४ असे मा.व पो नि सा गुन्हे शाखा यांच्या तोंडी आदेशाने पोलीस आयुक्तालय हद्दीमध्ये अवैद्य व्यवसाय करणारे विना परवाना दारु विकणारे व गुन्हेगार चेकींग यांचेवर कारवाई करणे कामी पेट्रोलींग करीत असता १७.०० वा दरम्याण गुप्त बातमीदाराने प्रत्यक्ष भेटुन खात्रीलायक माहिती दिली की, कुंभारवाडा येथे एक महिला स्वत च्या घरासमोर अवैद्यरित्या विना परवाना देशी दारुच्या पावटया विकत आहे. अशा मिळालेल्या माहिती वरुन पंचनाम्यातील नमुद पंच व आम्ही व पो स्टाफ असे तपास साहित्यासह कुंभारवाडा येथे जावुन सापळा लावुन थांबलो असता एक महिला दारु विक्री करताना दिसली. पंचाला दाखवुन आम्ही खात्री केली माहिला पोलीस अंमलदाराच्या मदतीने ताब्यात घेवुन त्यास आमचा परिचय देवुन तिच्या जवळील कापडी पिशवीची पाहणी केली असता त्यामध्ये देशी बॉबी संत्रा च्या ४८ पावटया मिळुन आल्या, दारु जवळ बाळगणे, विक्री करणे बाबत तिच्याकडे परवाना विचारला असता तीने तीचेकडे परवाना नसल्याचे सांगितले. सदर आरोपीच्या ताब्यामध्ये देशी दारु बॉबी संत्राच्या १८० मिलीच्या ४८ पावटया प्रत्येकी ८०/- रु प्रमाणे ३८४०/- रु किंमतीचा माल जप्ती पंचनाम्याप्रमाणे जप्त केला |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | अशा फिर्यादीच्या लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला.<br>विलंबाची कारण-लागलीच |